# समज गैरसमज ः नाडीपरीक्षा म्हणजेच खरा आयुर्वेद

आयुर्वेद म्हणजे झाडपाल्याची औषधं ! आयुर्वेदात पथ्यापथ्याची कटकट फार......! आयुर्वेद म्हटलं की गुण जरा उशीराच येणार म्हणा ... ... ...! पण काही म्हणा साइड इफेक्ट नसतो बघा आयुर्वेदिक औषधांना......!या आणि अशाच अनेक शेरे ताशेरेंपैकी एक......

''नाडीपरीक्षा म्हणजेच खरा आयुर्वेद......! अहो आपण काही सांगायचं नाही ते वैद्य नुसता नाडीवर हात ठेवतात आणि धडाधडा आपल्याला काय झालंय ते सांगतात................!!!'' ही सगळी अवास्तव आणि अतिशयोक्त विधाने आहेत.

अगदी खरं सांगू ...... मूळ आयुर्वेदात नाडीपरीक्षा नाही.........

आयुर्वेदाच्या मूळ शास्त्रीय ग्रंथात म्हणजे चरकसंहिता, सुश्रुतसंहिता, अष्टांगसंग्रह यांत कुठेही नाडीपरीक्षेचा साधा उल्लेखही नाही.

याउलट रोग्याचे सर्वांगीण परीक्षण करून मगच निदान रोगनिश्चिति करावी व औषधोपचार ठरवावेत असा शास्त्रादेश आहे. दूष्यं देशं बलं कालम् अनलं प्रकृतिं वयः / सत्त्वं सात्म्यं तथा आहारम् अवस्थाश्च पृथग्विधाः / सूक्ष्मसूक्ष्माः समीक्ष्य एषां दोष औषध निरूपणे // याचा अर्थ रूग्णाचे वय, बल, आहार, सवयी, ऋतु इ. सर्व बाबींचा सूक्ष्म समीक्षा करावी......मग हे नुसत्या नाडीपरीक्षेवरून संपूर्ण आजार ओळखणे हे 'मुद्यावरून गोष्ट' लिहीण्यासारखे झाले. अशी टूम कशी शास्त्रीय मानावी?

मग ही नाडीपरीक्षा आली तरी कुठून ?, तर १२व्या शतकानंतर मुस्लीम आक्रमणांत नालंदासारखी विद्यापीठे जळाली. शास्त्रीय अध्यापन संपले. परंपरागत कौटुम्बिक शिक्षण होऊ लागले. शास्त्रीय ग्रन्थ लुप्त झाले. राजाश्रय संपला. सामाजिक परिस्थितीमुळे स्त्रियांचे प्रत्यक्ष शारीरिक परीक्षण करणे अवघड झाले. असेही सांगतात की, आतील खोलीत बसलेल्या स्त्रीच्या मनगटाला दोरा बांधून बाहेर बसलेल्या वैद्याच्या हाती देऊन परीक्षण केले जाई.........

म्हणून नाडी हे शास्त्र नसून सोय आहे. नाडीपरीक्षा ही कला आहे. वैयक्तिक सिद्धि आहे. कारण शास्त्र म्हणजे ज्याचा सर्वांना सर्वकाळी समान प्रत्यय येतो. तसे नाडीचे नाही. एकाच रूग्णाच्या नाडीवरून भिन्न निदान सांगणारे लोक आहेत. आणि तुमची नाडी पाहून तुमच्या नातेवाईकाला झालेले आजार सांगणारेही आहेत. एकाच मैदानात एकाच चेंडूवर एक क्लीन बोल्ड होतो दुसरा तिथेच षट्कारांचा पाउस पाडतो. कारण ती कला आहे. शास्त्र नव्हे.

म्हणूनच फक्त नाडीपरीक्षा करून एकांगी निदान करण्यापेक्षा वय, व्यवसाय, आहार, पूर्ववृत्त, कुलवृत्त, स्वभाव, ऋतु असा सर्वांगीण विचार करून रोगनिदान केले पाहीजे. कितीही ज्येष्ठ डॉक्टर असले तरी ते स्वतःच्या अनुभवाची फुशारकी न मारता आवश्यक त्या सर्व रक्त मूत्र पासून ते अगदी एक्सरे, सोनोग्राफी, स्कॅन पर्यन्त सर्व रिपोर्ट पाहूनच उपचार ठरवतात.

आयुर्वेदीय उपचार करून घेतानाही फक्त नाडीपरीक्षा नव्हे तर सर्वांगीण परीक्षणाचाच आग्रह धरा.

किंबहुना <u>नाडी न तपासता</u> इतर सर्वांगीण परीक्षण करणारा वैद्यच 'आयुर्वेदीय' जाणावा.

© www.mhetreayurved.com, 9422016871